# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २०.०१.२०२६**

**जिल्हा : सातारा**

| मागील आठवड्यातील हवामान (१४.०१.२०२६ ते २०.०१.२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२१.०१.२०२६ ते २५.०१.२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | दिनांक | २१ | २२ | २३ | २४ | २५ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से.) | ३१ | ३१ | ३२ | ३१ | ३० |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से.) | १३ | १४ | १६ | १६ | १४ |
| - | - | - | - | - | - | - | ढग स्थिती (आकाश) | ० | १ | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८७ | ८३ | ९० | ९५ | ९१ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४७ | ४७ | ५० | ५० | ५१ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ७ | ५ | ३ | ३ | ५ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | ई. | पू.ई. | पू.ई. | वा. | ई. |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सातारा जिल्ह्यामध्ये दिनांक २१ ते २५ जानेवारी दरम्यान आकाश मुख्यत: स्वच्छ राहण्याची शक्यता आहे. सातारा जिल्ह्यामध्ये २५ जानेवारी पर्यंत कमाल तापमान ३०.० ते ३२.० अंश सेल्सिअस दरम्यान तसेच किमान तापमान १३.० ते १६.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ८३ ते ९५% या दरम्यान, दुपारची सापेक्ष आद्रता ४७ ते ५१% या दरम्यान राहण्याची तसेच वाऱ्याचा वेग ताशी ३ ते ७ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक २५ ते ३१ जानेवारी २०२६ दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची, कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ➢ फळे तसेच भाजीपाला पिकांमध्ये जमिनीतून बाष्पिभवन कमी होऊन जमिनीमध्ये ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आच्छादनाचा वापर करावा.<br>➢ फळबागेतील तापमान नियंत्रित राहण्यासाठी फळबागांना शक्यतो रात्रीच्या वेळी पाणी द्यावे.<br>➢ वेलवर्गीय भाजीपाला पिकांना आधार देण्यासाठी मंडप (दुधी भोपळा) व इतर पिकांसाठी ताटी पध्दतीचा वापर करावा. |
| संदेश | | ❖ बाष्पीभवनाचा वेग वाढल्यामुळे गहू, हरभरा आणि ज्वारी यांसारख्या रब्बी पिकांना त्यांच्या आवश्यकतेनुसार सिंचन द्यावे |
| गहू | फुलोरा ते चिक भरण्याची | ➢ गहू पिकास पेरणी नंतर ६० ते ६५ दिवस झालेले असल्यास फुलोरा ते चिक भरण्याच्या अवस्थेमध्ये असताना पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>➢ अंशत: ढगाळ हवामान असल्याने गहू पिकावर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे, प्रादुर्भाव दिसून येताच मॅन्कोझेब हे बुरशीनाशक प्रती हेक्टरी १.५ किलो ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.<br>➢ गेल्या आठवड्यात कमाल तापमान ३०.० ते ३३.० अंशांदरम्यान आणि किमान तापमान १६.० ते १९.० अंशांदरम्यान होते, जे गव्हावरील मावा (अफिड्स) प्रादुर्भावासाठी अनुकूल आहे. त्यामुळे गव्हावरील मावा नियंत्रित करण्यासाठी पिकावर थायमिथोक्सम (२५ डब्ल्यूजी) १ ग्रॅम किंवा ॲसिटामिप्रिड (२० एसपी) ५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| रब्बी ज्वारी | फुलोरा | ➢ बागायती ज्वारीमध्ये मध्यम जमिनीत तिसरे पाणी पिक फुलोऱ्यात असताना पेरणीनंतर ७० ते ७५ दिवसांनी आणि कणसात दाणे भरताना पेरणीनंतर ९० ते ९५ दिवसांनी द्यावे. |
| मका | शाखिय वाढ | ➢ मागील आठवड्यामध्ये थंड व अधिक आर्द्रतायुक्त हवामान राहिल्याने मका पिकावर टर्सिकम पर्ण करपा या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.<br>➢ या रोगामध्ये पानांवर लाब अंडाकृती, करड्या-हिरव्या रंगाच्या २.५ ते १५ सेमी. चिरा दिसून येतात.<br>➢ प्रादुर्भाव दिसून येताच मॅन्कोझेब / झायनेब २.५ ग्रॅम प्रती लिटर पाणी या प्रमाणात ८-१० दिवसांच्या अंतराने फवारावे. किंवा<br>➢ ॲझोक्झिस्ट्रोबीन १८.२% + डायफेनकोनॅक्झोल ११.४% एस.सी. १ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी. |
| भुईमुग | पेरणी | ➢ संरक्षित पाण्याची उपलब्धता असल्यासच उन्हाळी भुईमुग पेरणी १५ फेब्रुवारी पर्यंत करावी<br>➢ पेरणीसाठी फुले उन्नती, टी.ए.जी.-२४, टी.जी.२६, टी.पी.जे. ४१ व जे.एल.५०१ वाण वापरावेत.<br>➢ पेरणीचे अंतर ३०X१० से.मी. ठेवावे त्यासाठी हेक्टरी १०० ते १२० किलो बियाणे वापरावे.<br>➢ पेरणीपुर्वी २.५ ग्रॅम मॅन्कोझेब किंवा ४ ग्रॅम ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक प्रती किलो बियाणास वापरून बीजप्रकिया करावी.<br>➢ बुरशीनाशकाचे प्रक्रियेनंतर १ किलो बियाणांस २५ ग्रॅम रायझोबियम व २५ ग्रॅम स्फुरद विरघळणाऱ्या जीवाणू खतांची बीजप्रक्रिया करावी.<br>➢ पेरणीच्या वेळी भुईमूग पिकास हेक्टरी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद द्यावे. स्फुरद खताची मात्रा शक्यतो सिंगल सुपर फॉस्फेटच्या माध्यमातून दयावी. यासोबत पिकास हेक्टरी १२५ किलो जिप्समचा पहिला हप्ता द्यावा.<br>➢ जस्त व बोरॉन या सुक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असलेल्या जमिनीत दोन वर्षातुन एकदा हेक्टरी २५ किलो झिंक सल्फेट व ५ किलो बोरॅक्स, सेंद्रिय खतांसोबत जमिनीतुन पेरणीपुर्वी द्यावे. |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


| | | |
|---|---|---|
| ऊस | सुरु ऊस लागवड | ➢ सुरु ऊस लागणीसाठी पूर्व मशागतीची कामे पूर्ण करून दोन डोळा टिपरीने ऊसाची लागण १५ फेब्रुवारी पर्यंत करावी.<br>➢ उसाची लागण सलग पध्दतीने करताना दोन सऱ्यामधील अंतर मध्यम जमिनीत १ मीटर व भारी जमिनीत १.२० मीटर ठेवावे. तसेच जोड ओळ पध्दतीने लागण करावयाची असल्यास मध्यम जमिनीत २.५-५ फूट व भारी जमिनीत ३-६ फूट अंतर ठेवावे.<br>➢ लागणीसाठी को ८६०३२, कोएम०२६५, फुले १०००१, फुले ०९०५७, फुले ११०८२, फुले ऊस १५०१२, फुले ऊस १३००७, व्हीएसआय ८००५, को. ९४०१२, कोसी ६७१ आणि को. ९२००५ (कोल्हापूर विभागात) यापैकी एका वाणाची निवड करावी. लागवडीसाठी एक अथवा दोन डोळयांच्या टिपऱ्या अथवा प्लास्टीक ट्रे मधील एक डोळा रोपे वापरावीत.<br>➢ लागणीपूर्वी बेणे १० ग्रॅम कार्बेन्डॅझिम १० लिटर पाण्यात मिसळून त्यामध्ये १०-१५ मिनिटे बुडवावे व नंतर ॲसेटोबॅक्टर व स्फुरद विरघळविणारे जिवाणू अनुक्रमे १ किलो व १२५ ग्रॅम प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून त्यात कांडया ३० मिनीटे बुडवून लगेच लागण करावी. |
| स्ट्रॉबेरी | वाढीची | ➢ स्ट्रॉबेरी फळझाडांना जमिनीच्या मगदुरानुसार २ ते ३ दिवसाआड ठिबक सिंचनाद्वारे पाणी द्यावे. |
| द्राक्ष | मन्यांची वाढ | ➢ द्राक्षाच्या घडांमधील तडे गेलेल्या/नुकसान झालेले मणी काढून टाकावेत. हे तडे गेलेले मणी एका कंटेनरमध्ये गोळा करून हा कंटेनर द्राक्षबागांपासून सुमारे १०० फूट अंतरावर ठेवावा<br>➢ व्हिनेगर माशी या कुजडलेल्या बेरीकडे आकर्षित होतीत. या माश्यांच्या नियंत्रणासाठी कंटेनरवर स्पिनोसॅड ४५ एस.सी. @ ०.२५ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. |
| आले | पक्वता | ➢ बाजारातील मागणीप्रमाणे पक्व आल्याची काढणी करावी. काढणीनंतर आल्याचे कंद स्वच्छ धुवून मातीपासून वेगळे करावे आणि बाजारात पाठवावे. |
| हळद | पक्वता | ➢ पिकाची काढणी जातीपरत्वे पिकाचा कालावधी पुर्ण झाल्यावर करावी. काढणीपूर्वी जमिनीच्या प्रतिनुसार १५ ते २० दिवस पाणी देणे बंद करावे. सरीवरंबा पध्दतीवर कुदळीने खोदून काढणी करावी तर गादीवाफे पध्दतीवर मशिनच्या सहाय्याने काढणी करावी |
| पशुधन | वाढीची | ➢ म्हैस: आहार व निगा : क्षमतेइतके दूध मिळण्यासाठी सर्वसाधारणतः ४०० किलो वजन असलेल्या म्हशीस दररोज २५ किलो हिरवा व ७ते ८ किलो कोरडा चारा शरीर पोषणासाठी द्यावा.<br>➢ दूध निर्मितीसाठी, दररोजच्या एकूण दूध उत्पादनाच्या ५०% खुराक द्यावा म्हणजे दूध उत्पादनाचे सातत्य टिकून राहील.<br>➢ प्रत्येक म्हशीला पिण्यासाठी ६० ते ७५ लि. पाणी रोज लागते. |

स्त्रोत
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

ठिकाण : कोल्हापूर
दि. : २०.०१.२०२६

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**